| | |
|---|---|
| <u>प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१</u> | <u>नि.दि.दा.क्र. १७१/२०१५</u> |
| | **पुर्णाबाई विरुध्द चंद्रभान** |
| **मी शपथपूर्वक खरे सांगतो की** | **निशाणी – ११०** |

**पुढील सरतपासणी शपथेवर सुरु प्रतिवादी तर्फे वकील श्री. चहांदे यांच्या मार्फत**

४३. मला आता निशाणी ११० कडील माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले. त्यावर मी सहया केल्या आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

४४. मला आता निशाणी १०६/१ व १०६/२ कडील अधिक्षक भुमी अभिलेख व तालुखा निरीक्षक भुमी अभिलेख यांच्याकडे माझे वडील चंद्रभान यांनी दाखल केलेल्या अर्जाची स्थळप्रत दाखविली. त्यावर माझ्या वडीलांचा अंगठा आहे, तो मी ओळखतो, त्यास **<u>निशाणी ११७ व ११८</u>** देण्यात येते.

४५. मला आता निशाणी १०६/३ कडील दस्त दाखविला, सदरचा दस्त तहसिलदार यांनी पारित केलेल्या आदेशाचा आहे, त्यास **<u>निशाणी ११९</u>** देण्यात येते.

४६. मला आता निशाणी १०६/४ कडील तालुखा निरीक्षक भुमी अभिलेख यांच्याकडे माझे वडील चंद्रभान यांनी दाखल केलेल्या अर्जाची स्थळप्रत दाखविली. त्यावर माझ्या वडीलांचा अंगठा आहे, तो मी ओळखतो, त्यास **<u>निशाणी १२०</u>** देण्यात येते.

४७. मला आता निशाणी १०६/५ कडील दस्त दाखविला, सदरचा दस्त हा उपाधिक्षक भुमीअभिलेख यांनी दिला आहे, तसेच निशाणी १०६/६, १०६/७, १०६/८, १०६/९, १०६/१०, १०६/११ कडे गट नं.२१५/१, २१५/२, ८०/१, ८०/१, २१५/१, २१५/२, चे ७/१२ चे उतारे दाखविले, ते तलाठी यांच्याकडून सही शिक्क्याच्या नकला करून दाखल केले आहे. तसेच निशाणी १०६/१२ व निशाणी १०६/१३ कडे दावा मिळकतीच्या नकाशाच्या सही शिक्क्याच्या प्रती व निशाणी १०६/१४ ते १०६/२६ कडे महसूल अधिका–याकडून मिळालेल्या ७/१२ च्या प्रती तसेच फेरफार पत्रक व रिनंबरींग पर्चा दाखल केला आहे. त्यांना अनु.क्र. **<u>निशाणी १२१ ते १४२</u>** देण्यात येते.

४८. मला आता निशाणी १०३ सोबतचा मुद्रांक कलेक्टर यांच्या अर्जासोबतचा दस्त दाखविला. सदरचा दस्त हा हक्क सोड पत्राचा आहे. या दस्ताप्रमाणे पुर्णाबाई यांनी चंद्रभान व चुडामन यांच्या नावे हक्क सोडला होता. तसेच याच दस्ताने झिभलाबाई यांनीही हक्क सोडला होता. झिभलाबाई मयत आहे. साक्षीदार व्ही. आर. भारद्वाज व वामनराव भगवानजी नागपुरे हे दोघेही मयत आहे. सदरचा दस्त लिहीणारा व्यक्ती मयत आहे. दस्तातील मजकूर मी वाचून पाहिला आहे, तो बरोबर आहे. (<u>प्रतिवादीच्या वकीलांनी सदरच्या दस्तास निशाणी देण्याची विनंती केली. वादीच्या वकीलांनी सदरच्या दस्तास साक्षीदार हा कोणत्याही पध्दतीचा पक्षकार नसल्याने त्यास निशाणी देता येणार नाही असा युक्तीवाद केला, तसेच दस्त हा नोंदणीकृत नसल्याने तो पुराव्यात वाचता येणार नाही असा युक्तीवाद केला. या हरकतीचा विचार करता या दस्तास सध्या केवळ ओळखीसाठी निशाणी देण्यात येत आहे. दस्त पुराव्यात वाचता येतो की नाही यासाठीचा मुद्दा खूला ठेवण्यात येतो</u>.) त्यास ओळखीसाठी **<u>निशाणी १४३</u>** देण्यात येते.

४९. दावा प्रलंबित असताना वादीने दावा मिळकत विकली आहे. मला आता त्या दस्ताची सही शिक्याची नक्कल दाखविली, ती निशाणी ११२/१ कडे आहे. त्यास **<u>आर्टिकल–अ</u>** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास वादी तर्फे वकील श्री. राव यांच्यातर्फे**

५०. पुर्णाबाई माझी आत्या आहे. माझे वडीलांना एक भाउ आहे, त्यांचे नाव चुडामन भोयर आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत आमची वडीलोपार्जित शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे आजोबा नामदेव व झिबलीबाई यांच्या मालकीच्या दावा मिळकती होत्या, त्यांचा सर्वे नं.१०२, ४७, १०२/अ, १०२/ब, ४७/१, ४७/३ व ४७/४ असे आहे. हे म्हणणे खरे आहे की नामदेव कास्तकार होते. त्यांच्याकडे दोन बैलजोडी, दुधाच्या म्हशी, गायी होत्या का हे मला माहिती नाही. त्यांच्याकडे सोन्याचे किती दागिने होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की नामदेव यांचे खंडाळा येथे घर होते

**उलटतपास वादीतर्फे वकील यांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत तहकूब**

**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.18 16:23:34 +0530

कामठी ( एम.आर. कामत )
दिनांक १८/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी